# संत भक्तराज महाराज यांचे चरित्र : खंड ५
# संत भक्तराज महाराज
# यांची वैशिष्ट्ये आणि कार्य

## अनुक्रमणिका

**( काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे ( मुद्दे.) '*' या चिन्हाने दर्शवली आहेत. )**


**प्रकरण १**

**प.पू. श्री अनंतानंद साईश यांच्या पादुका,**

**प.पू. भक्तराज महाराज यांच्या पादुका आणि 'गादी'**

१. प.पू. श्री अनंतानंद साईश यांच्या पादुका ८

१ अ. प.पू. श्री अनंतानंद साईश यांनी दिलेल्या स्वतःच्या पादुका ८

१ आ. बाबांनी दिलेल्या प.पू. श्री अनंतानंद साईश यांच्या पादुका १०

२. प.पू. भक्तराज महाराज यांच्या पादुका १०

३. प.पू. भक्तराज महाराज यांची 'गादी' १०

**प्रकरण २. प.पू. भक्तराज महाराज यांचे हस्ताक्षर १२**

**प्रकरण ३. प.पू. भक्तराज महाराज यांचा प्रवास १५**

**प्रकरण ४**

**प.पू. भक्तराज महाराज आणि भक्त**

१. बाबांची विविध प्रकारे सेवा करणारे भक्त १७

२. भजनातील प्रमुख साथीदार ३१

३. मोटारी आणि चालक ३३

४. बाबा आणि भक्त यांच्यातील पत्रव्यवहार ३८

५. बाबांनी भक्तांना केलेले साहाय्य ५८
६. बाबांनी केलेले वाईट शक्तींच्या त्रासांवरील उपाय ५९

**प्रकरण ५. प.पू. भक्तराज महाराज यांच्या स्वरचित भजनांचे कार्यक्रम ६२**

**प्रकरण ६. प.पू. भक्तराज महाराज यांनी इतर संस्थांना केलेले साहाय्य ६३**

## प्रकरण ७
## प.पू. भक्तराज महाराज ( बाबा ) यांचे आश्रम आणि त्यांच्या आशीर्वादाने स्थापन झालेल्या संस्था

१. आश्रमात राहाण्याचा लाभ ६४
२. बाबांचे आश्रम ६५
३. बाबांचा आश्रमातील दिवस ७९
४. आश्रमात येणाऱ्यांचे अनुभव ७९
५. आश्रमात येणाऱ्यांविषयी बाबांचा दृष्टीकोन ८१
६. आश्रमाविषयी बाबांचे विचार ८१
७. प.पू. भक्तराज महाराजांच्या आशीर्वादाने स्थापन झालेल्या संस्था ८९

## प्रकरण ८
## प.पू. भक्तराज महाराज यांच्याशी संबंधित प्रकाशने

१. बाबांची भजने ९५
२. चरित्र ९६
३. इतर ९६
    ३ अ. भक्तांचा राजा : माझे सद्गुरु भक्तराज ९६
    ३ आ. Thus spake Bhaktaraj Maharaj ९६
    ३ इ. ॐ सद्गुरुप्रसाद ९६
    ३ ई. ‘श्रीं’ च्या पाद्यपूजेनंतर म्हणावयाच्या आरत्या, अष्टके आणि पदे ९७
    ३ उ. भाऊ बाबांचा आवडता का ? ९७
४. प.पू. साई अनंतानंद सेवा संस्थान यांची प्रकाशने ९७

५. भक्तराज प्रकाशने ९७
५ अ. सद्‌गुरु कृपा कल्पतरु    ५ आ. भक्तराज दिनदर्शिका - २००३ ९७
६. प.पू. भक्तराज महाराज यांच्याशी संबंधित सनातन-निर्मित प्रकाशने आणि उत्पादने ९८

## प्रकरण ९
## भक्तांनी प.पू. भक्तराज महाराज ( बाबा ) यांच्यावर रचलेली काही भजने आणि आरती

१. बाबांवरील संस्कृत रचना १००
२. संस्कृत भजन ११०
३. मराठी भजने १११
४. ज्या भजनांत बाबांचे ‘भक्तराज’ किंवा ‘बाबा’ असे नाव लिहिले आहे, अशी भजने ११३
५. प.पू. सद्‌गुरु भक्तराज महाराज यांची आरती ११५

## प्रकरण १०
## अनुभूती

१. ‘संत भक्तराज महाराज यांचे चरित्र’ या ग्रंथाचे संकलन करतांना आलेल्या अनुभूती ११६
२. ग्रंथाची संरचना करतांना आलेल्या अनुभूती ११८
३. ग्रंथात असलेल्या चैतन्याविषयी साधकांना आलेल्या अनुभूती ११९
४. ‘संत भक्तराज महाराज यांचे चरित्र’ या ग्रंथमालिकेतील ग्रंथांची मुखपृष्ठे सिद्ध (तयार) करतांना आलेल्या अनुभूती १२०

## प्रकरण ११
## ज्योतिषशास्त्राच्या दृष्टीकोनातून प.पू. भक्तराज महाराज

१. ज्योतिषी आणि भविष्यकार यांनी सांगितलेले प.पू. भक्तराज महाराज यांचे भविष्य १२२
२. जन्मकुंडली १२३

२ अ. पारंपरिक पद्धत १२३
२ आ. कृष्णमूर्ती पद्धत १२७
२ इ. पुनर्जन्म कुंडली (गुरुप्राप्तीच्या वेळच्या पत्रिकेप्रमाणे) १३०
२ ई. पुनर्नामकरण कुंडली (गुरूंनी ‘भक्तराज’ असे नामकरण केले त्या वेळच्या पत्रिकेप्रमाणे) १३७
३. हस्तसामुद्रिक १४२
४. पदसामुद्रिक १४८
५. जन्मकुंडली, हस्तसामुद्रिक आणि प्रत्यक्षातील जीवन १५१

**प्रकरण १२**

**प.पू. भक्तराज महाराज यांची छायाचित्रे आणि सूक्ष्म-ज्ञानविषयक चित्रे**

१. प.पू. भक्तराज महाराज यांची प्रचलित आणि सनातनच्या ग्रंथांत असणारी तीन प्रमुख छायाचित्रे १५५
२. प.पू. भक्तराज महाराज यांची सूक्ष्म-ज्ञानविषयक चित्रे १५६
३. अन्य चित्रे १५८

# मनोगत

## पहिल्या आवृत्तीचे मनोगत

### १. चरित्रलिखाणाचा विचार

‘प.पू. श्रीमत् सद्‌गुरु भक्तराज महाराज यांची शिकवण’ हा आमचा ग्रंथ प्रकाशित झाल्यावर बऱ्याच जणांनी विचारणा केली, ‘महाराजांचे चरित्र आहे का ?’ त्यांना डॉ. विठ्ठल माधव पागे यांनी अतिशय परिश्रमपूर्वक माहिती जमा करून, वाङ्‌मयीन भाषेत लिहिलेले ‘नाथ माझा भक्तराज’ हे चरित्र उपलब्ध असल्याचे आम्ही सांगत असू. पुढे ‘त्याच्या प्रती संपल्या आणि पुनर्मुद्रण करण्याचा विचार नाही’, असे प्रकाशकांकडून कळल्यामुळे ‘आता चरित्र वाचायला कसे द्यायचे ?’, हा प्रश्न आला. आमच्या संस्थेद्वारे अध्यात्मशास्त्राचे अभ्यासवर्ग प्रत्येक मासाला (महिन्याला) ठिकठिकाणी घेतले जातात. त्या वर्गांची आणि त्यांना उपस्थित रहाणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने

आणि संस्थेच्या कार्यामागची प्रेरणा प.पू. भक्तराज महाराज यांची असल्याचे आम्ही सांगत असल्याने चरित्राची मागणी वाढत होती. त्यामुळे शेवटी आम्हीच चरित्र लिहायचे ठरवले.

## २. चरित्रलेखनाची पद्धत

बाबांचे आचरण कसे होते, त्यातून साधकांना काय शिकता येईल, या दृष्टीने चरित्र लिहायचे, असे आम्ही ठरविले. स्थुलातील तपशिलांना अल्प महत्त्व द्यायचे ठरवून चरित्रातील जास्तीतजास्त भाग शिष्यांना, साधकांना उपयुक्त होईल असा लिहायचा, या दृष्टीने हे चरित्र लिहिले आहे. ‘अध्यात्म’ या विषयाकडे आम्ही ‘शास्त्र’ या दृष्टीने पहात असल्याने आणि हे चरित्र अध्यात्मातील एका अधिकारी व्यक्तीचे असल्यामुळे चरित्र नेहमीच्या गोष्टीरूप भाषेत न लिहिता शास्त्रीय भाषेत लिहिले आहे.

## ३. लेखक नव्हे, तर संकलक

एक वेळ काल्पनिक लेखन करणारे कथा-कादंबरीकार ‘लेखक’ म्हणून आपले नाव लिहू शकतात; पण चरित्र लिहितांना घडलेल्या घटना एकत्र संकलित करून लिहिणे एवढेच लेखकाचे कार्य असते. हे झाले स्थुलाच्या, बुद्धीगम्य माहितीच्या संदर्भात. अध्यात्माच्या सूक्ष्म-दृष्टीने विचार करता बाबांनीच चरित्र-लेखनाचा विचार आमच्या मनात आणला, त्यासाठी उपयुक्त माहिती मिळेल असे केले; म्हणूनच ‘लेखक’ या शब्दापेक्षा ‘संकलक’ हा शब्द वापरला आहे.

## ४. अपूर्ण

अनंताचे आणि शब्दातिताचे चरित्र थोड्या पानांत आणि शब्दांत लिहिण्याचा हा प्रयत्न आहे. बाबांच्या जीवनात अजून बरेच काही घडत आहे आणि आम्हालाही नवीन जाणिवा होत आहेत. तरीही, अशा अपूर्ण चरित्रातूनही साधकांना साधनेची स्फूर्ती मिळावी, अशी बाबांच्या चरणी प्रार्थना !

**- संकलक**

## विभाजित पाचव्या खंडाच्या आवृत्तीचे मनोगत

अमृतमहोत्सवाची गडबड संपल्यावर चरित्रातील बराचसा भाग बाबांनी कु. सीमा गरुड यांच्याकडून वाचून घेतला. काही भाग वाचतांना बाबांनी नवीन माहिती सांगितली, तसेच काही प्रसंगांचे विश्लेषण केले. तो सर्व भाग चरित्र ग्रंथाच्या सुधारित आवृत्तीत घ्यायचा होता. बाबांच्या देहत्यागानंतरही त्यांच्याविषयीची आणखी काही सूत्रे (मुद्दे) त्यांच्या सान्निध्यात राहिलेल्या काही

भक्तांकडून मिळत गेली. तीही सूत्रे सुधारित आवृत्तीत घ्यायची होती; पण यामुळे सुधारित आवृत्तीची पृष्ठसंख्या बरीच वाढू शकली असती; म्हणून चरित्र ग्रंथाचे विषयांनुसार आता पाच खंडांमध्ये विभाजन केले आहे.

प्रस्तूत खंडात बाबांच्या गुरूंच्या पादुका अन् बाबांच्या पादुका आणि 'गादी'; बाबांचे हस्ताक्षर; बाबांचा प्रवास; बाबा आणि भक्त यांच्यातील पत्रव्यवहार; बाबांनी भक्त आणि धार्मिक संस्था यांना केलेले साहाय्य; बाबांचे आश्रम अन् त्यांच्या आशीर्वादाने स्थापन झालेल्या संस्था; ज्योतिषशास्त्राच्या दृष्टीकोनातून बाबांची आगळीवेगळी वैशिष्ट्ये इत्यादींविषयी सविस्तर विवरण दिले आहे.

हा ग्रंथ वाचून काही जणांनी तरी साधनेला आरंभ करावा, अशी श्री गुरुचरणी प्रार्थना !

**- संकलक**